ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 6 | FEBRUARY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतीय आदिवासी कवितेतील महापुरुषांचे दर्शन



**प्रा. अभिमन्यू गेना ओहळ**
**सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,**
**छ. शिवाजी रात्र महाविद्यालय, सोलापूर.**

## प्रास्ताविक

1960 नंतर सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक अशा सर्वच स्तरावर उलथापालथी झाल्या. याला आदिवासी समाजही अपवाद नाही. साठोत्तरी कालखंडात शिक्षण, दळणवळण, विज्ञान, तंत्रज्ञान या क्षेत्रात प्रगती झाली आणियाचा आदिवासी समाजावर परिणाम होऊन त्यांचा नागव जिवनात प्रवेश झाला. लोकशाही शासन यंत्रणा, राजकारण यांचा त्यांच्या जिवनावर परिणाम झाला. तसेच साहित्यक्षेत्रातही आदिवासी समाजातील लेखकांनी आपल्या भावभावना, प्रश्न, संस्कृती, कला यांचे दर्शन आपल्या साहित्यातून मांडले. आदिवासी साहित्य हे दलित साहित्याचाच भाग असल्याचे अभ्यासकांचे मत होते. परंतु भौगोलिक, सामाजिक, वांशिक व धार्मिक अशा सर्वच बाबतीत आदिवासी साहित्याच्याअभ्यासकक्षा वेगळया आहेत. थोडक्यात 'आदिवासी' हा प्रतिपाद्य विषय आणि 'आदिवासी जाणीव' हा लेखकाच्या जीवनदृष्टीचा अविभाज्य भाग असलेल्या साहित्यास 'आदिवासी साहित्य' म्हणतायेईल. मराठी साहित्यामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून वारली, कातकरी, भिल्ल, पावरी, गोंड, ठाकर आणिडांगी जमातींवर काही कथाकादंबऱ्या प्रसिध्द आहेत. स्वातंत्र्योत्तर कालखंडात आदिवासी साहित्यालाबहर आलेलादिसून येतो. यातून त्यांनी आपल्या जिवंत दृष्टीविषय जाणिवा, प्रेरणा मांडल्या आहेत.

## आदिवासी साहित्याच्या प्रेरणा:

कोणताही अविष्कार किंवा नवनिर्माण घडुन येण्यामागे प्रेरणा या असतातच. साहित्य म्हणजे कल्पनातीत वास्तव, सृजनशिलता, नवनिर्माण. हे निर्माण होण्यापाठीमागेही प्रेरणा या असणारच. आदिवासी साहित्यही त्याला अपवाद नाही. आदिवासी साहित्याला ऐतिहासिक, सांस्कृतिक, जीवननिष्ठ व सामाजिक स्वरुपाच्या प्रेरणा लाभलेल्या आहेत. आदिवासींचा ऐतिहासिक वारसा त्यांच्या लोकगीत, लोककथा, लोकनृत्य यासारख्या वाङमयातून पहायला मिळतो. आदिवासी संस्कृती ही निसर्गाच्या सानिध्यात नांदणारी संस्कृती आहे. घनदाट अरण्याशी या संस्कृतीची नाळ जोडलेली आहे. निसर्गापासून जे-जे मिळते त्यावर उपजिविका करणे, जंगलात गुरे चारणे, रात्री चांदण्याच्या उजेडात स्त्री-पुरुष, अबालवृध्दांनी एकत्र येऊन अंतर्मुखी होऊन नाचगाणे करणे हे करीत असताना जंगलाचे रक्षण करणे हे सारे त्यांच्या जीवनशैलीचा एक भाग आहे. आदिवासी मन हे माणूस आणि माणूसकीला जपणारे आहे, माणसांवर प्रेम करणारे आहे, कुटुंब-वत्सल आहे, मातृसत्ताक कुटुंबपध्दतीला महत्त्व देणारे आहे. या सर्वांचा आदिवासी साहित्यावर परिणाम झालेला आहे. तसेच 19व्या शतकातील उत्तरार्धात व

नंरतच्या दलित-बहुजनांच्या उध्दारासाठी बिरसामुंडा, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या महापुरुषांनी केलेल्या कार्यापासून प्रेरणा घेऊन आदिवासी साहित्य अवतरले आहे. सामाजिक चळवळी आदिवासी साहित्याला प्रेरक ठरल्या आहेत. या चळवळींचा आदिवासी साहित्याच्या निर्मितीमागे सिंहाचा वाटा आहे.

## आदिवासी कवितेतील होणारे महापुरुषांचे दर्शन :

आदिवासी कवितेतून त्यांचा इतिहास येतो. कारण आदिवासींचा इतिहास हा विजयाचाजेत्यांचा इतिहास आहे. त्यांची संस्कृती ही नाविण्यपूर्णहोती. त्यांचे पूर्वजमहापुरुष, इतिहासात पराक्रम गाजवलेलंहोतं. या साऱ्यांची मराठी सारस्वतांनी उपेक्षित ठेवले होते. आदिवासींचा इतिहासही प्रस्थापित व्यवस्थेत उपेक्षित राहिला आहे. त्यामूळे या साऱ्यांचे दर्शन जगाला व्हावे या हेतुने आदिवासी कविंनी आपल्या कवितांमधून या साऱ्यांना प्रेरणा मानुन त्यांचे वर्णन केलेले आहे. आदिवासी कवितेतून तंटया भिल्ल, राणी दुर्गावती, बिरसा मुंडा या महापुरुषांची वर्णने वारंवार येताना दिसतात. भुजंग मेश्राम यांनी आपल्या 'उलगुलान' या कवितासंग्रहातील 'बिरसा मुंडा' या कवितेतून बिरसा मुंडा यांची थोरवी मांडली आहे. ते लिहितात,

"लोक तुझी वाट पाहत आहेत
ज्या खडतर वाटेने तु निघुन गेलास ती पायवाट
आजचा राजमार्ग झालाय तुझ्याआठवणी सारखाच...
नागडया रात्री दहशतीचे साम्राज्य असतानाही
असंख्य तारकांसह चंद्र असावा तसा..."

बिरसा मुंडा यांच्या कार्याची, क्रांतीची छाप कवी भुजंग मेश्राम यांचयावार इतकी पडली आहे की त्यांना स्त्रीयांच्या कामात, कष्टकऱ्यांच्या घामात, आई-बहिणींच्या डोईवरील मोळयांमध्ये, तेंदुवनाच्या खळयामध्ये, व्याजात गेलेल्या शेतामध्ये, बाजुरीच्या बटवडयावर, कोड पाखंडीच्या पोळात अशा अनेक ठिकाणी त्यांना बिरसा मुंडा दिसुन येतो. इतिहासाने त्यांची माहिती लपवली त्यांचे त्यांना दुःख वाटते. त्यामूळेच त्याची थोरवी ऐकताना त्यांचा उर भरुन येतो. ते म्हणतात,

"आईला पहाटेच जात्यावर तुझी गाणी गाताना,
मी ऐकत असतो डोळे मिटून:"
(बिरसा मुंडा: उलगुलान पृ.क्र.44,45)

अनेक कविंनी बिरसा मुंडाचे कमी-अधिक प्रमाणात वर्णन केलेले आहे. पुरुषोत्तम शेडमाके यांनी 'वर्णसुर्य' या कवितेतून क्रांतिवीर नारायणसिंह उईकेंचे वर्णन केले आहे. ते म्हणतात,

"गोंडवणात सिंह गर्जना करीत
फिरणाऱ्या क्रांतिवीरा !
अभंगग क्रांतिज्योतीगत
फडफडणारे तुझे आयुष्य
खोदल्या गेली आदिवासींच्या नसानसात
रोवल्या गेली स्मृती शिल्पे चौकाचौकात
हे महामानवा!

तु ओळखलेस
इथल्या शत्रू मित्राची नस
पारखलास आपल्या आत्म्याचा कस
कर्मयोगी क्रांतिवीरा !"
(वर्णसूर्य, पृ.क्र. 21,22)

क्रांतिवीर नारायणसिंह उईके यांनी आपले जगणं-मरणं, संपूर्ण आयुष्यच आदिवासींसाठी अर्पण केले होते. तीच क्रांतीची भाषा पुरुषोत्तम शेडमाके यांच्या या कवितेतून व्यक्त होताना दिसते. त्यांनी आपल्या कवितांमधून भिवसन, क्रांतिपुत्र बाबुराव पुलेश्वर, एकलव्य, वीरांगणा राणी दुर्गावती अशा महान, पराक्रमी, शुरवीर स्त्री-पुरुषांची क्रांतीदर्शी वर्णने अनेक ठिकाणी केलेली आहेत. असेच त्यांच्या कवितेतून क्रांतिपुत्र बाबुराव पुलेश्वरांचे वर्णन आले आहे.

"मातेच्या उदरी जन्मास यावा
तुझ्याच सारखा हुतात्मा
इतिहासाच्या अंतापर्यंत तुझे नाव
ज्योती बनुन चिरकाल प्रकाशील
स्मरणात आहे नव ऑगस्ट क्रांती दिवस
झाला होता गौरव साऱ्या हुतात्म्यांचा
फुलुन आले तेंव्हामाझे हदय अतिव आनंदाने
तुझे नाव ऐकून"
(वर्णसूर्य पृ.क्र.44)

नऊ ऑगस्ट हा क्रांती दिवस म्हणून पाळला जातो. यावेळी साऱ्या क्रांतीकारकांचे स्मरण करून त्यांना वंदन केले जाते. त्यामुळेच क्रांतीपुत्र बाबुराव पुलेश्वरांचे नाव घेऊन त्यांनाही सन्मान दिल्याचे पाहून कवीचा उर भरून आल्याचे दिसुन येते. कवीने एकलव्याचाही जयजयकार आपल्या कवितेतून केलेला आहे. गुरुद्रोणाच्या कपटामूळे उपेक्षितच राहिला. याची खंत मांडताना कवी शेडमाके म्हणतात,

"धनुष्यास दोरा लावून
कीर्तिमान पावलेल्या एकलव्या
दिग्विजयी ठरलास
आपली प्रखर साधना तेजवून
महाभारतातल्या धनुर्धरात
साधका..."
(वर्णसूर्य, पृ.क्र.48)

एकलव्याची ही उपेक्षा कवीच्या मनात धूर करून राहिली आहे. तसेच शेडमाके यांनी राणीदुर्गावती यांच्याविषयी त्यांच्या विरगाथेविषयीही लिहिले आहे. राणी दुर्गावतीच्या शौर्याचे वर्णन करताना कवी शेडमाके लिहितात,

"दुर्गावती तुझ्या रक्ताळलेल्या तीक्ष्ण तीरांनी
लिहिलेत अभंग इतिहास
इथल्या सावत्र रचनेच्या आलेखात असले
पुरावे फार मोलाचे वाटतात.
कारण, तेजाळलेली अनंत रत्ने
काळाच्या गर्भात लुप्त झाली आहे स्मरणात
वीरांगणा! तू वीरश्री ठरलीस
चाटुन जातो तुझ्या न झुकणारा स्वाभिमान"
(वर्णसूर्य, पृ.क्र.60)

राणी दुर्गावतीचा इतिहास प्रस्थापित व्यवस्थेने त्यांच्या सोईचा नसल्याने लपवून ठेवला पण खराइतिहास लपत नसतो, तो कधी ना कधी बाहेर येतोच आणि साऱ्या जगाला आपली वीरश्री सांगून जातो याचेच यथोचित वर्णन शेडमाके यांनी केले आहे. आदिवासी गडावरच्या भिवसेन या देवाला त्यांचा संकटकालीन आधार मानतात. तो सर्व आदिवासीमध्ये पुजनीय आहे. त्याचे वर्णन करताना कवी सांगतो की,

"गडावरच्या भिवसेना
मार एकदाचा टाहो
डाव मांडिले संगती
कळपात कोण राहो
गोंडियनाचा तू रे देव"
(वर्णसूर्य, पृ.क्र.42)

कवी पुरुषोत्तम शेडमाके यांनी आपल्या कवितांमधून अनेक आदिवासी क्रांतिवीरांची वर्णन गायली आहेत. त्यांचे मन:पूर्वक स्मरण करून त्यांच्याविषयी आपुलकी, आस्था, अभिमान, गर्व बाळगला आहे.

कवी बाबुराव मडावी हे आदिवासी कवितेतील एक महत्त्वाचे कवी होत. त्यांनी आपल्या कवितांमधून बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर या समाजसुधारकांना वंदन करून त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धगधगते आयुष्य, त्यांचे कार्य, विचार यामूळे आदिवासी कवी प्रेरित झाले आहेत. त्यांच्या कार्याला सलाम करताना कवी मडावी म्हणतात,

"बाबासाहेब, तुम्ही दाखविलेल्या
मार्गावरन जाताना
ही मधात दगडं कशी
आमचे पाय ठेचाळतात
रक्तबंबाळ होतात
हे लोकशाहीला अडविणारे कोण?
आमच्यामार्गात
अडथळे निर्माण करणारे कोण?
बाबासाहेब
आता आम्ही कुठवर सहन करावं

समतेच्या क्रांती युध्दातील
रणांगनातले आम्ही
भीमसैनिक झालो!"

(पाखरं, पृ.क्र.56)

बाबासाहेबांचे आयुष्य हे धगधगते अग्निकुंड होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य हे दीनदलितांच्या लढाईसाठी झोकून दिले. सभा, संमेलने, सात्याग्रह, घटनानिर्मिती या सर्वातून त्यांनी दलितांना न्याय-हक्क् मिळवून दिले आणि त्यांच्याच मार्गावरून हा समाज चालतो आहे याचा अभिमान कवीला आहे हे येथे पहायला मिळते. बाबासाहेबांच्या पत्नी माता रमाई हा सर्वच दलित, आदिवासी, साहित्यिकांचा कविंचा जिव्हाळयाचा, आदराचा, वंदनीय विषय राहिला आहे. माता रमाईचे वर्णन करताना कवी मडावी रमाई कवितेत म्हणतात,

"माझ्या रमाईचे गुणगान
करू किती पोटतिडकीनं
लहानपणापासून करूनेन
भरल जीवन अनाथ रमाई
रमाई परिस्थितीशी झुंजली
बाबासाहेब या सोन्याच्या
दागिन्यापेक्षा
तुम्हीच माझा दागिना
धीर देत होती
भीमाला"

(पाखरं (रमाई) पृ.क्र.61)

माता रमाईबरोबरच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे हे गुणगान कवी मडावी यांनी केले आहे. स्त्रीशिक्षणाचे अमुल्य कार्य त्यांनी केले नसते तर आजचा हा देश कसा असला असता? याचा विचार करून कवी सावित्रीबाईबद्यल लिहितात,

"सावित्री
तु तुझ्यालुगडयाच्या
झोळीत यशवंताला
मायेची उब दिलीस
तेंव्हा प्रस्थापितांनी
तुला गोटे फेकून
मारले
त्याचे तू बॉम्ब केलेस
तू इथल्या व्यवस्थेवर
चित्कारलीस
तू यशवंतची माय
झालीस" (पाखरं, पृ.क्र.57)

सावित्रीबाईंचे कार्य हे स्त्रीयांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी सोसलेल्या छळामूळे त्यांनी स्त्रीशिक्षणासाठी केलेल्याप्रयत्नामुळे आजची स्त्री सर्वच क्षेत्रात उंच भरारी घेताना दिसते आहे. त्यांनी स्त्री, अस्पृश्य, दीनदुबळयांच्या शिक्षाणासाठी शेण, दगडगोटे अंगावर झेलले. त्यामुळेच आज भारतीय समाजाच्या उध्दारासाठी केलेल्या त्यांच्या प्रयत्नांचा परिणाम पहायला मिळतो आहे.

भारतीय समाजात जसे जातीधर्माचे प्रस्थ होत तसे पाश्चिमात्त्य देशात वर्णसंघर्ष होता. काळे-गोरे हा भेद तिथै प्रामुख्याने पहायला मिळत होता. कृष्णवर्णीयांना ते गुलाम मानत होते. त्यांना माणुसकीचे हक्क नाकारले होते. निग्रो विरुध्द गोरे असा उघड-उघड भेद होता.आणि काळयाला गोऱ्याच्या गुलामीतून, अन्यायातून शोषितांना मुक्त केले. याच कारणामुळे ते सबंध जगभरात कष्टकऱ्यांचे, पिडितांचे प्रेरणास्त्रोत ठरले आहेत. त्यांच्याच कार्याला वंदन करण्यासाठी उषाकिरण आत्राम यांनी आपल्या 'म्होरकी' या काव्यसंग्रहातून गुणवर्णन केले आहे. त्या म्हणतात,

"मानवतेच्या क्रांतिसुर्या
कृष्णवर्गीयांच्या राष्ट्रपित्या
युगांध काळोखातील मुक्तसुर्या!
हे घनघोर वादळा
मानवतेच्या हक्कासाठी
आयुष्याचे दान देणाऱ्या
वीर कोटीतील मूर्तिमंत प्रतीका!
न्याय हक्कांसाठी तीन तपे
काळोख लेवून काळोख पिकून
जिवंत सरण धगधगत राहिलास
शोषितांच्या मायबाप-नेल्सन मंडेला
तुझ्या आचाट साहस त्यागापुढे
सूर्य नतमस्तक होऊन तुझ्यात उतरली
तमाम मानवता-रक्तकमळांनी-सूर्यकमळांनी
तुला शत-शत करते प्रणाम"
(म्होरकी, पृ.क्र.68)

गोऱ्यांचे अत्याचार मोडीत काढून काळयांना, निग्रोना समानतेचे हक्क् मिळवून देणारे नेल्सन मंडेला हे आदिवासी कवींना प्रेरणादायी वाटतात. मुक्ती सूर्य वाटतात, क्रांतीसूर्य वाटतात. याबरोबरच भगतसिंग, गांधी हे महापुरुषही त्यांना जवळचे वाटतात. त्यामूळेच या महापुरूषांचे स्मरण करण्यासाठी आदिवासी कविंनी त्यांच्यावर कविता केलेल्या आहेत.

## समारोप:

आदिवासी समाज हा जंगलात, डोंगरदऱ्यात राहून जंगलतील मिळणाऱ्या पदार्थांंवर उपजिविका करणारा समाज आहे. त्यांचा इतिहास हा पराक्रमाचा, जेत्यांचा इतिहास होता. परंतु इथल्याप्रस्थापित समाजव्यवस्थेने तो इतिहास जगापुढे येवू दिला नाही. त्यामुळे राणी दुर्गावती, क्रांतीवीर नारायण सिंह उईके, बिरसामुंडा यांसारखे अनेक क्रांतीकारी व्यक्तीमत्त्व समाजापुढे आलेच नाहीत. त्यांच्या पराक्रमांना समोर ठेवूनच आदिवासी समाजा मार्गक्रमण

करताना दिसतो आहे. त्यांच्या वीरगाथा पारंपारिक लोककथा, लोकगीतांमधून आजही ऐकायलामिळतात. त्यामूळेच त्यांच्या कार्याचे स्मरण आदिवासी कवींनीआपल्या कवितेतून केले आहो. एकलव्य हे महाभारतातील उपेक्षित पात्र गुरु सर्वश्रेष्ठ धनुर्धर परंतु गुरु द्रोणाचार्याच्या अर्जुन प्रेमामूळे एकलव्याला आपला अंगठा गमवावा लागला. याचेही स्मरण कवी आपल्या कवितेतून करतात. भिवसेन हा महापुरुष आदिवासींचे रक्षण करतो अशी आदिवासींची श्रध्दा आहे. यांची तो अडचणीतून मार्ग दाखवतो. जीवनातील अंधार दुर करून उजेडाचा मार्ग दाखवतो. याचेही वर्णन आदिवासी कवितेतून होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई, सावित्रीबाई फुले, नेल्सन मंडेला हे मानवतेचे पुजारी, मार्गदाते, क्रांतीपुरुष, प्रज्ञासूर्य होत. यांच्या विचारांवरच आज सर्व समाज मार्गक्रमण करतो आहे. याचेही चित्रण आदिवासी कवितेतून येते. एकंदरीत सर्व महापुरुषांचे चित्रण आदिवासी कवींनी आपल्या कवितेतून केले आहे.

## संदर्भ:

1. डॉ. प्रमोद मुनघाटे: आदिवासी मराठी साहित्य: स्वरूप व समस्या
2.भुजंग मेश्राम: उलगुलान
3. पुरुषोत्तम शेडमाके: वर्णसूर्य
4. उषाकिरण आत्राम: म्होरकी